"डॉ. जनार्धन वाघमारे एक राजकीय नेतृत्व : चिकित्सक अभ्यास"

❖ प्रस्तावना

भारताच्या सामाजिक व राजकीय व्यवस्थेला लोकशाही शासन व्यवस्थेच्या दिशेने घेऊन जाण्यात अनेक घटकांचे महत्वाचे योगदान आहे. यातील राजकीय नेतृत्व हा एक महत्वपुर्ण घटक आहे. राष्ट्राच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व हा एक मुलभूत स्वरुपाचा महत्वपुर्ण घटक आहे. नेतृत्वाचे सर्वदूर व त्यांना मानणारे अनुयायी यांच्या परस्पर संबंधातुन अनेक विविध संस्था विकसित होताना दिसतात. यामुळेच प्रत्येक राजकीय व्यवस्थेच्या विकासात राजकीय नेतृत्वाची भूमिका महत्वपूर्ण असते. राजकीय नेतृत्व आणि विकास, राजकीय नेतृत्व आणि व्यवस्था व राजकीय नेतृत्व आणि समाज परिवर्तन यांचा अन्योन्य संबंध आहे.

"एखाद्या गटाचे विशिष्ट ध्येय प्राप्त करण्याच्या प्रयत्नांनी संघटन व दिग्दर्शन करण्याच्या हेतुने प्रेरित झालेले वर्तन" अशी नेतृत्वाची परिभाषा राज्यशास्त्र कोषात करण्यात आली. सेलिंग्मन या अभ्यासाने "नेतृत्वाद्वारे राजकारण हे अधुनिक काळाचे ठळक वैशिष्ट आहे." असे विधान केले. राजकीय म्हणजे सत्तेसंबंधी माणसाचे व्यवहार तर, समुहातील व्यक्ती म्हणजे नेता अशी साधी व सरळ राजकीय नेत्याची व्याख्या करता येईल. परंतु मानवी जिवनाचा राजकीय व अराजकीय असा तुटकपणे अभ्यास करता येत नाही. कित्येक आर्थिक, शैक्षणिक व धार्मिक घटनांचे परिणाम राजकीय असतात. तर याउलट राजकीय घटनांचे परिणाम आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक होऊ शकतात. म्हणुन आर्थिक, धार्मीक सामाजिक आदि परिस्थीतीचा परिणाम राजकीय नेतृत्वाच्या स्वरुपात होत असतो.

प्रसिद्ध ग्रीक राजकीय तत्वज्ञानी ॲरिस्टॉटलने चांगल्या व आदर्श नेतृत्वाच्या ठिकाणी कोणते गुण असावेत याबाबत आपल्या लिखाणात चर्चा केलेली आहे. त्यांच्या मते इथॉस (सामाजिक भावनिष्ठा), पॅथॉस (कारुण्य) व लॉगॉस (शब्द सामर्थ) या तीन गुणांनी संपन्न व्यक्ती नेतृत्वास पात्र ठरते. तेव्हा व्यक्ती या गुणांनी संपन्न असेल, तरच आदर्श व विकासाभिमुख नेतृत्व उदयास येते. सामाजीक भावनिष्ठेतुन नेत्याचे चारित्र्य सूचित होते व इतरांचे मतपरिवर्तन करण्याची क्षमता त्याला मिळत असते.

लोकशाही शासनात आता राजाचा कर्ता हा शासनाचा केवळ भाग राहिला नाही. तर संपुर्ण शासन व्यवस्थेच्या संघटनेचे केंद्र बनला आहे. भारतासारख्या अनेक नवोदित स्वतंत्र राष्ट्रांमध्ये लोकशाही शासन स्थापन झाले. स्वातंत्र्य पुर्व काळातील त्याग व लोकप्रियतेच्या आधारावर राजकीय सत्तेचा वापर करुन तेथील

कर्तबगार नेत्यांनी ती कशी-बशी टिकवण्याचा प्रयत्न केला. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात नेतृत्वाच्या स्वरुपात सातत्याने बदल झाले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात अनेक सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थित्यंतरे घडून आली. त्यामुळे राजकीय नेतृत्वाच्या शैलीतही अमुलाग्र बदल झाले. या बदलाचे परिणाम भारतातील विविध घटक राज्यातील राजकीय नेतृत्वावर झाले. यात महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व अपवाद नाही. महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर आंदोलन 'संयुक्त महाराष्ट्र' चळवळीतून अनेक राजकीय नेतृत्वाचा उदय झाला. ज्यात भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण यांचा उल्लेख करता येईल. वाढते जातीय राजकारण, ओ.बी.सी. राजकारण व समाजकारणाचा उदय धर्मधिष्ठत राजकारण, पक्षश्रेष्ठीतील अंतर्गत वाद, नेतृत्वासाठीची स्पर्धा इत्यादीतून महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख, शिवराज पाटील चाकुरकर, नारायण राणे, छगन भुजबळ, गोपिनाथ मुंडे, वसंतदादा पाटील, सुधाकरराव नाईक, प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले इत्यादी नेतृत्वाचा उदय झाला. यासह विकासाभिमुख राजकारण व सत्ता परिवर्तनाचे साधन आहे, असे समजून राजकीय व्यवस्थेचे संचलन करणारे राजकीय नेतृत्व महाराष्ट्रातून हद्दपार होत असल्याचे भासत आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय व्यवस्थेला प्रभावीत करुन फुले, शाहु, आंबेडकरांसह छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविण्यासाठी अनेक नेतृत्वाने आपले योगदान दिले. त्यातील एक महत्वपुर्ण नेतृत्व म्हणजे डॉ. जनार्धन वाघमारे होय. म्हणुन राजकीय नेतृत्वाचे विश्लेषणात्मक संशोधन करण्यासाठी डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या नेतृत्वाचा अभ्यास करण्याचा मानस आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक राजकीय नेतृत्व आहेत परंतु या सर्वात डॉ. जनार्धन वाघमारे यांचा वेगळेपणा जानवतो शैक्षणिक गुणवत्ता व शैक्षणिक विकासातुन शहराचा सर्वांगीन बदल करता येतो यास प्रमाण माणुन डॉ. जनार्धन वाघमारे यांनी राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणुन कार्य केले. या कार्यातून लातूर पॅटर्नच्या निर्मितीत योगदान दिले. महाराष्ट्रातील एक उच्च शिक्षणतज्ञ, अभ्यासक, विचारवंत अशी डॉ. जनार्धन वाघमारे सरांची ओळख माझ्या सारख्या अभ्यासकाला प्रभावित व आकर्षीत करते. या आकर्षणाने माझ्या मनात डॉ. जनार्धन वाघमारे सरांचा प्राचार्य ते खासदार हा प्रवास अभ्यासावा अशी भावना निर्माण झाली. तसेच शिक्षणाच्या प्रचार प्रसारातुन राजकारणात काम करण्याची संधी मिळू शकते. हेही सरांच्या व्यक्तीमत्वातून भावनारा महत्वाचा मुद्दा आहे. याची उकल संशोधनाच्या चौकटीतुन व्हावी म्हणुन डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या राजकीय नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास करण्याचे ठरवले.

कोणत्याही प्रकारची राजकीय प्रार्श्वभूमी नसणारे, जिवनाच्या प्रारंभी स्थानिक ते राष्ट्रीय सक्रीय राजकारणाची तोंडओळख नसणारे परंतु त्यांचा अभ्यास करणारे सर लातूर शहर नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणुन सर्वानुमते निवडून येतात, राज्यसभेचे खासदार होतात. हा सगळा प्रवास समजून घेऊन जनता, समाज व शासनाच्या समोर संशोधनाच्या माध्यमातुन आणता यावा म्हणुन संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

डॉ. जनार्धन वाघमारे सर ज्या वेळी राज्य व राष्ट्राच्या राजकारणात सक्रिय सहभागी होतात, ती वेळ सौदेबाजीच्या राजकारणाची, भ्रष्टाचाराची, नातेवाईकांना पोसनारी, चंगळवादी व भाई-भतीजा वादाच्या राजकारणाची होती. तरी डॉ. जनार्धन वाघमारे सरांवर या कशाचाही प्रभाव पडला नाही. एक स्वच्छ प्रतिमेचा पारदर्शक प्रशासक व विकासाभिमुख व्यक्तीमत्वाचा राजकारणी अशी प्रतिमा सरांची आहे. जी वर्तमानातील प्रस्तापित व नवोदित राजकारण्यास प्रेरणादायी आहे. सरांच्या व्यक्तीमत्वातील प्लेटोच्या विचारातील एक आदर्श नेता जाणून घेऊन त्याची गरज मांडण्याच्या हेतूने डॉ. जनार्धन वाघमारे सरांच्या राजकीय नेतृत्वाचे अनेक पैलू अभ्यासावे, म्हणुन हा विषय निवडला.

सर्वात महत्वाचे म्हणजे डॉ. जनार्धन वाघमार सर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे पहिले कुलगुरु होते. ते कुलगुरु म्हणुन महाराष्ट्रातील विविध भागात आपल्या व्यक्तीमत्वाची बरीच छाप पाडली. त्यांच्या नेतृत्वात आपल्या विद्यापीठाने योग्य वाटचाल केली. उच्च शिक्षणाचा प्रचार प्रसार व्हावा. सर्वांना शिकण्याची संधी मिळावी. मराठवाड्यातील भागात या विद्यापीठाने सर्व शिक्षणाचे मापदंड पाळावेत व एक आदर्श विद्यापीठ, आदर्श विद्यार्थी, आदर्श शिक्षणसंस्था उभ्या राहाव्यात यासाठी सरांनी या परिसरात जे काम केले. कुलगुरु म्हणुन उच्च शिक्षणातील अनेक घटकांबाबत जे विचार मांडले ते विचार आजही विद्यापीठाच्या परिसरात व या भागातील लोकांच्या आठवणीतुन जात नाहीत. या विचार व कार्यांना संशोधनांच्या माध्यमातुन याच विद्यापीठातून मांडावेत जे यापूर्वी झाले नाही. तसेच संशोधन हे नवनविन विषयावर ज्यांनी खरचं एक ध्येय उराशी बाळगून कार्य केले, त्यांच्यावरच व्हावे. त्यामुळे डॉ. जनार्धन वाघमारे सरांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करताना त्यांचे शैक्षणिक, सामाजिक विचार व कार्याचा आढावा घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत विषय निवडला.

लातूर ही राजकीय नेतृत्वाची खान आहे. विलासराव देशमुख, शिवराज पाटील चाकुरकर, शिवाजी पाटील निलंगेकर इत्यादी अनेक नेतृत्वांनी लातूर जिल्ह्याच्या विकासात व महाराष्ट्रात लातूरचा नावलौकीक केला. तरीही डॉ. जनार्धन वाघमारे सरांच्या स्वरुपात एक नेतृत्व लातूर शहरातुन उदयास आले. या नेतृत्वाने राज्यसभेचे खासदार म्हणुन सहा वर्ष काम केले, या सहा वर्षाच्या काळात सरांनी विविध विषयावर अभ्यासपुर्ण

मांडणी करुन अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समित्यांवर काम केले. ज्यामुळे लोकशाही शासन व्यवस्था, संसदीय शासन प्रणालीस हातभार लागला. सरांच्या अभ्यासपुर्ण कार्यशैलीने शासनाच्या अनेक समस्या सोडवण्यास मदत झाली. राज्यसभेचा एक खासदार म्हणुन सर आपणास परिचीत आहेत. परंतु या काळात सरांनी काय कामे केली ? ते सर्वसामान्य नागरीकांना माहित नाही. त्या कार्यामुळे काय साध्य झाले ? याचे विश्लेषणात्मक चिंतन व्हावे, म्हणुन संशोधनासाठी प्रस्तुत विषय निवडला आहे.

❖ संशोधन समस्या (Research Problem):-

राष्ट्र व समाजाच्या विकासात संशोधन हा एक महत्त्वाचा भाग आहे. व्यक्तीने आपल्या सभोवतालच्या परिस्थीतीकडे सदसद विवेक बुद्धीने दृष्टीक्षेप टाकला असता त्यास संशोधनासाठी अनेक विषय दिसुन येतील. संशोधन हे फार गुंतागुंतीचे व किचकट आहे. असा समज असतो. या समस्येला खोटे ठरविण्याची पहिली पायरी म्हणजे स्वतःत विकसीत होणारी संशोधक वृत्ती व त्या दिशेने संशोधकाचे पडणारे पहिले पाऊल होय. असेच माझे पहिले पाऊल राज्यशास्त्र या विषयात संशोधन करण्यासाठी पडले. राज्यशास्त्र या सामाजिक शास्त्रात संशोधन करत असतांना मी माझ्या सभोवतालच्या राजकीय परिस्थितीचे व व्यक्तिमत्वाचे अवलोकन केले. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, स्वा.रा.ती.म. विद्यापीठाच्या जडण-घडणीत ज्या पहिल्या कुलगुरुंनी महत्वाचे योगदान दिले त्यांच्यावर राज्यशास्त्र या विद्याशाखेत संशोधनपर कार्य झाले नाही. ते करावे असा विचार व त्या अनुषंगाने अनेक प्रश्न माझ्या मनात निर्माण झाले. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) माझ्या सारख्या सर्वसाधारण संशोधकाला व या विद्यापीठात शिकलेल्या विद्यार्थ्यांला डॉ. जनार्धन वाघमारे हे नाव फक्त ऐकीव होते परंतु या संशोधनाच्या निमित्ताने मला डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या सामाजिक-राजकिय विचार व कार्याची सखोल माहिती संकलीत करण्याची संधी मिळाली. जे माझ्या पुढील वाटचालीसाठी अतिशय प्रेरणादायी ठरेल म्हणुन मी संशोधनासाठी हा विषय निवडला आहे.

२) कोणत्याही प्रकारचा शैक्षणिक, सामाजिक व राजकीय वारसा नसतानाही डॉ. जनार्धन वाघमारे यांनी शैक्षणिक सामाजिक व राजकीय क्षेत्रात केलेली प्रगती माझ्या मनात कुतूहल निर्माण करणारी आहे. डॉ. जनार्धन वाघमारे यांच्याकडे पाहता असेच कुतूहल अनेक जनांच्या मनात निर्माण होत असेल, मानवी मनाचे हे कुतूहलाचे कोडे सोडवण्यासाठी मी प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

३) राज्यसभेचा सदस्य म्हणुन डॉ. जनार्धन वाघमारे यांनी नेमके कसे व काय काम केले? हे जाणुन घेण्याच्या हेतुने मी हा विषय निवडला आहे.

४) महाराष्ट्राचा वैचारीक क्षेत्रातील अनेक विद्वानांचा शोध घेतला असता. डॉ. जनार्धन वाघमारे हे एक नाव पुढे येते. त्यामुळे डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील वैचारीक प्रगल्भता व चिंतन आपण समजुन घ्यावे व संशोधनातुन समाज आणि शासनाच्या समोर मांडावे म्हणुन संशोधनासाठी प्रस्तुत विषय निवडला आहे.

५) डॉ. जनार्धन वाघमारे यांचे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय जिवनातील मूल्य व्यक्तीमत्वाची जडण-घडण यासर्व बाबी समजुन घेण्याच्या हेतुने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या विषयी पडलेल्या विविध प्रश्नांचे उत्तर शोधण्याच्या मानसीकतेतुन मी "डॉ. जनार्धन वाघमारे एक राजकीय नेतृत्व : चिकित्सक अभ्यास" संशोधनासाठी निवडलेला आहे.

❖ संशोधनाची उदिष्टे (Objectives of Research):-

१) डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या जिवन चरित्राचा अभ्यास करणे.

२) डॉ. जनार्धन वाघमारे यांचे सामाजिक विचार समजुन घेणे.

३) डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.

४) डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या राजकीय वाटचालीचा अभ्यास करणे

५) डॉ. जनार्धन वाघमारे यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

६) डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या स्थानिक ते राष्ट्रीय राजकारणातील योगदानाचा अभ्यास करणे.

❖ संशोधनाची गृहीतके (Hypothesis of Research):-

प्रस्तुत विषयाचाअभ्यास खालील गृहीतकांना प्रमाण माणुन करण्यात येणार आहे.

१) डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या सामाजीक राजकीय जडण-घडणीत शिक्षणाचे योगदान महत्वपुर्ण आहे.

२) डॉ. जनार्धन वाघमारे यांचे सामाजिक-राजकीय नेतृत्व लोकशाही मुल्यावर आधारित आहेत.

३) डॉ. जनार्धन वाघमारे यांनी नगरअध्यक्ष व संसद सदस्य म्हणुन केलेले कार्य लोकशाहीभिमुख, पारदर्शक व उत्तम नेतृत्वाप्रमाणे आहे.

४) डॉ. जनार्धन वाघमारे हे उच्चशिक्षण तज्ञ आहेत

५) डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या राजकीय विचारावर फुले शाहु आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव आहे.

६) डॉ. जनार्धन वाघमारे यांचे संसदेतील कार्य भारतीय संविधान, लोकशाही आणि जनहिताच्या कार्याला मजबुत करणारे आहे.

❖ संशोधनाचे महत्व (Importance of Research):-

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला विषय "डॉ. जनार्धन वाघमारे एक राजकीय नेतृत्व : चिकित्सक अभ्यास" असुन या विषयाचे महत्व खालीलप्रमाणे सांगण्यात येते.

१) मराठवाड्यातील लोकशाही प्रक्रिया उशीरा सुरु झाली, त्यात प्रस्तापित समाजातील नेतृत्वापुढे नविन नेतृत्व उदयास येण्यास अनुकूल परिस्थिती नव्हती. अशा परिस्थीतीत नवोदित नेतृत्व विकास प्रक्रीयेवर प्रकाश टाकणे या दृष्टीने महत्वाचे ठरते.

२) महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणात सहभागी होवु इच्छिणाऱ्या उच्च शिक्षणातील अनेक मान्यवरांना हा शोध प्रबंध निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

३) डॉ. जनार्धन वाघमारे यांचे सामाजिक व राजकीय नेतृत्वावर आजपर्यंत संशोधनाच्या चौकटीत राहुन सखोल चिंतन झालेले नाही; ही उणीव भरुन काढण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन उपकारक ठरेल.

४) प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरु, नगर परिषद अध्यक्ष ते राज्यसभा सदस्य यांच्या यशाची चढती कमान अधोरेखीत करणे महत्वाचे ठरते.

५) पक्ष नेतृत्वाने मराठवाड्यातील नेतृत्वाला दिलेले बळ व केलेले राजकारण यांची उकल होण्यासाठी यामुळे मदत होईल.

६) डॉ. जनार्धन वाघमारे यांनी केलेले कार्य आणि दिलेले योगदान यांच्या अभ्यासातुन राजकीय नेतृत्वाबाबतचे नवे प्रतिमान आकार घेऊ शकते. या दृष्टीकोनातुन प्रस्तुत अध्ययन महत्वाचे ठरते.

७) डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या राजकीय चिंतनातुन अधुनिक राजकीय स्थिती, भारतीय लोकशाही पुढील अव्हाने व उपाय या संबंधाने हे अध्ययन महत्वाचे ठरते.

वरील सर्व बाबी प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्व सिद्ध करणाऱ्या आहेत.

❖ संशोधन पद्धती (Research Method):-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी समाजिकशास्त्रातील संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. ज्यामध्ये ऐतिहासिक, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तसेच ग्रंथालयीन अभ्यास पद्धीचा आधार घेवून व डॉ. जनार्धन वाघमारे आणि त्यांच्याशी निगडीत व संबंधीत लोकांच्या अनुभवाचा आधार घेवून हे संशोधन पुर्ण करण्यात येईल.

❖ संशोधनाच्या मर्यादा (Limitation of Research) :-

प्रस्तुत संशोधन फक्त आणि फक्त डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या सामाजिक-राजकीय विचार व कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यापुरतेच मर्यादित आहे.

❖ तथ्य संकलन (Data Collection) :-

सामाजिक शास्त्रातील कोणतेही संशोधन तथ्य संकलना शिवाय पुर्ण होऊ शकत नाही. तथ्य संकलन संशोधनाचा आधार आहे. तथ्यांच्या संकलनासाठी प्राथमिक तथ्य व द्वितीय तथ्यांचा आधार घेतला आहे.

❖ प्राथमिक स्त्रोत (Primary Data):-

प्राथमिक तथ्य हा संशोधनाचा मुलभुत आधार असतो. प्रस्तुत विषयात डॉ. जनार्धन वाघमारे यांनी सामाजिक व राजकीय विचारांचे आणि कार्याचे स्पष्टीकरण ज्या ग्रंथातुन केले ते ग्रंथ, त्यांनी विविध मासिकातुन लिहिलेले लेख, नगराध्यक्ष असतांना घेतलेले ठराव व कुलगुरु म्हणुन काम करताना घेतलेले निर्णय, विविध वर्तमानपत्र व नियतकालीकातुन महाराष्ट्र व देशाच्या शिक्षण व राजकारणाबाबत मांडलेले मत, राज्यसभेत विविध प्रश्नांवर दिलेले उत्तर, प्रश्नांची केलेली मांडणी या सर्वांचा समावेश प्राथमिक तथ्यात होतो. या शिवाय विषयाच्या सखोल मांडणीसाठी प्रत्यक्षात डॉ. जनार्धन वाघमारे यांची घेतलेली मुलाखत व कुटुंबासोबत केलेली चर्चा या सर्वांचा समावेश प्राथमिक तथ्यात येतो.

❖ द्वितीय स्त्रोत (Secondary Data) :-

प्रस्तुत विषय संशोधन पुर्ण करण्यासाठी डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या व्यक्तिमत्व, विचार व कार्याविषयी विविध वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके इत्यादीतुन इतरांनी सरांविषयी केलेले लिखान, वाघमारे सरांसंदर्भात त्यांच्या सहकारी मित्राकडून माहिती संकलीत करण्याच्या अनुषंगाने घेतलेल्या मुलाखतींचा समावेश द्वितीय तथ्यांत होतो.

❖ संशोधन आराखडा (Research Design) :-

संशोधकाने "डॉ. जनार्धन वाघमारे एक राजकीय नेतृत्व : चिकित्सक अभ्यास" या विषयाची मांडणी पुढील प्रकरणाच्या आधारे केली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाची समस्या, उदिष्टे, गृहितके, तथ्य संकलन, संशोधन पद्धती, संशोधनाचे महत्व व संशोधन आराखडा इत्यादीची मांडणी केली जाणार आहे.

प्रकरण दुसरे - डॉ. जनार्धन वाघमारे यांचा जीवन परिचय

प्रस्तुत प्रकरणात डॉ. जनार्धन वाघमारे यांची कौटुंबिक पार्श्वभुमी, बालपण, शिक्षण, व्यक्तिमत्व व वैचारिक जडण-घडणीला प्रभावीत करणाऱ्या घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण तिसरे - डॉ. जनार्धन वाघमारे यांचे राजकीय विकासातील प्रारंभीक योगदान

प्रस्तुत प्रकरणात डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या सामाजिक, राजकीय विचारसरणीचे व योगदानाचे सविस्तर विश्लेषण करण्यात येईल. जेणे करुन डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या राजकीय विकासातील प्रारंभीक योगदान स्पष्ट करता येईल.

प्रकरण चौथे - डॉ. जनार्धन वाघमारे यांचे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासातील योगदान (लातूर नगरपालिका)

प्रस्तुत प्रकरणात डॉ. जनार्धन वाघमारे यांनी लातून नगर पालिकेचे अध्यक्ष म्हणुन केलेल्या कार्याचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण पाचवे - डॉ. जनार्धन वाघमारे यांचे राज्यसभेतील कार्य

प्रस्तुत प्रकरणात डॉ. जनार्धन वाघमारे यांनी राज्यसभेचे सदस्य असतांना केलेल्या कार्याचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे - डॉ. जनार्धन वाघमारे यांचे लातूर जिल्ह्यातील राजकीय विकासातील योगदान

प्रस्तुत प्रकरणात डॉ. जनार्धन वाघमारे यांनी लातूर जिल्ह्यातील राजकीय विकासात दिलेल्या योगदानचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सातवे - निष्कर्ष

प्रस्तुत प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात एकुण अभ्यासातुन निष्पन्न झालेले निष्कर्ष नोंदवण्यात येतील.

❖ **परिशिष्टे**

❖ **संदर्भ ग्रंथ सूची**

संशोधन कालावधीदरम्यान उपलब्ध होणारे तथ्यसंकलन व माहितीनुसार संशोधन आराखड्यात काही प्रमाणात बदल होऊ शकतो.

❖ **संदर्भ ग्रंथ सूची**

१) मूठभर माती (आत्मकथा)

२) समाजपरिवर्तनाच्या दिशा

३) चिंतन यात्रा

४) चिंतन एका नगराध्यक्षाचे

५) लोकशाही आणि शिक्षण

६) संपादन : कर्तृत्वाचा सहाद्री

७) विमर्श

८) स्वातंत्र्य एक चिंतन

९) शरद पवार व्यक्तित्व, नेृत्रत्व आणि कर्तृत्व

१०) महाराष्ट्रातील राजकारण आणि समाजकारण

११) हाक आणि आक्रोश

१२) शिक्षण : समाजपरिवर्तन व राष्ट्रीय विकास

१३) प्राथमिक शिक्षण : यश, अपयश आणि भवितव्य

१४) आजचे शिक्षण : स्वप्न आणि वास्तव

१५) साहित्य चिंतन

१६) चिंतन एका कुलगूरुचे

१७) परिवर्तन : संकल्पना, वेध आणि वास्तव

१८) जीवनेरखा (व्यक्तिचित्रे)

१९) ज्ञानविज्ञानाच्या देशात (प्रवासवर्णन)

२०) व्यक्तिवलये (व्यक्तिचित्रे)

२१) बखर एका खेड्याची (कादंबरी)

२२) बदलते शिक्षण स्वरुप आणि समस्या

२३) मंथन

२४) मातीवरच्या ओळी

२५) विचारमुद्रा

२६) ध्यास परिवर्तनाचा

२७) सहजीवन

२८) दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी

२९) व्यक्तित्व आणि कर्तृत्व

३०) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतीकारक शैक्षणिक विचार आणि कार्य

३१) अमेरिकन नीग्रो साहित्य आणि संस्कृती

३२) स्वामी दयानंद सरस्वती : विचार, कार्य व कर्तृत्व

३३) महर्षी दयानंद सरस्वती : विचार, कार्य व कर्तृत्व (अनुवादित)

संशोधक विद्यार्थी

गुंडेराव सुमेद चापाजी
एम.ए. सेट
मु. पो. दिवशी बु. ता. भोकर

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. लक्षटे आर.बी.
संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर
ता. देगलूर जि. नांदेड